दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com ●संपादक : अजय भांगे ●उपसंपादक : गणेश गाडेकर https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ●सोमवार दि.११ ऑगस्ट २०२५ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष २ रे ● अंक २५६ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Monday 11 August 2025 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 2nd ● Issue 256 ● Pages 4 ● Rate 4 Rs

**प्रतिनिधी नेमणे आहे**

लोकप्रिय विभागीय दैनिक वादळ वार्ता साठी महाराष्ट्रात सर्वत्र जिल्हा , तालुका , सर्कल व गावस्तरावर प्रतिनिधी नेमणे आहे. तरी इच्छुकानी मो.न.9422660077, 9766440025 संपर्क साधावा .

# योजना ५ वर्षे सुरूच राहणार

## लाडक्या बहिणींच्या मानधनात वाढ करणार–मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### लाडकी बहीण योजनेत भ्रष्टाचार शक्य नाही

**महायुती सरकारने राज्यात केजी ते पीजीपर्यंत शिक्षण मोफत केले आहे. यामुळे आता महाराष्ट्रातील महिला थांबणार नाहीत. महिला थांबल्या नाहीत तर राज्याचा विकासही थांबणार नाही, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. लाडकी बहीण योजनेत थेट लाभार्थींच्या खात्यात पैसे जमा होत असल्याने भ्रष्टाचाराची शक्यता नाही. तरीही विरोधक भ्रष्टाचाराचे आरोप करतात, असेही फडणवीस म्हणाले.**

**मुंबई (वृत्तसंस्था)**–मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रक्षाबंधनानिमित्त महिलांना मोठे आश्वासन दिले आहे. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना पुढील पाच वर्षे सुरूच राहणार आहे. सध्या मिळणाऱ्या मानधनात आणखी वाढ केली जाईल, अशी घोषणा त्यांनी केली. मुलुंड येथे आयोजित रक्षाबंधन कार्यक्रमात बोलताना त्यांनी हे वक्तव्य केले. या वेळी फडणवीस यांनी महाविकास आघाडीवर जोरदार टीका केली.

योजना सुरू करत असताना अनेकांनी विरोध केला आणि कोर्टात गेले. मात्र, लाडक्या बहिणींनी अनेक सावत्र भावांचे मनसुबे उधळले, असा टोला फडणवीस यांनी लगावला. सध्या योजनेचा लाभ अडीच कोटी महिला घेत आहेत. काही भावांनी बहिणींच्या नावानेच पैसे घेणे सुरू केले. काहींनी पुरुष आहे हे लक्षात येईल म्हणून मोटारसायकलचा फोटो लावला. असे सगळे शोधून काढले असून त्यांचे पैसे थांबवले आहेत. मात्र, अशा प्रत्येकाची पडताळणी करा, अशा सूचना जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. पात्र महिलांना त्यांचा लाभ मिळाला पाहिजे. मात्र, घुसखोरांना बाहेर काढा, अशा सूचना दिल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.



### सक्षमीकरणावर भर


**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या धोरणांची प्रशंसा करत फडणवीस यांनी महिलांना अर्थव्यवस्थेचे दुसरे चाक म्हटले. बेटी बचाओ, बेटी पढाओपासून सुरू झालेला प्रवास लखपती दीदीपर्यंत पोहोचला आहे. राज्यात २५ लाख लखपती दीदी तयार झाल्या असून एक कोटी महिलांना लखपती बनवण्याचे उद्दिष्ट असल्याचे त्यांनी सांगितले. महाराष्ट्रात महिला बचत गटांसाठी उमेद मॉल उभारले जाणार असून पहिल्या टप्प्यात १० मॉल सुरू होतील. महिलांनी घेतलेल्या कर्जाची परतफेड १०० टक्के होते, याचेही त्यांनी कौतुक केले.**

# आज माजी नगराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी यांच्या वाढदिवसा निमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन

## मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

माजीमंत्री आ. धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वाखाली काम करणारे परळी शहरातील कर्तृत्ववान, उमदे युवा नेतृत्व व परळीच्या सर्वांगीण विकासाचा मुख्यदुवा म्हणून यशस्वी कारकीर्द निर्माण केलेले माजी नगराध्यक्ष तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे लोकप्रिय शहराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी यांच्या वाढदिवसा निमित्त (दि.११) रोजी रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले आहे.या शिबिरात मोठ्या प्रमाणात सहभागी व्हावे असे आवाहन करण्यात आले आहे.माजीमंत्री ना. धनंजय मुंडे यांच्या प्रेरणेने बाजीराव भैय्या धर्माधिकारी मित्रमंडळाच्या वतीने माजी नगराध्यक्ष



बाजीराव भैया धर्माधिकारी यांच्या वाढदिवसा निमित्त दिनांक ११ ऑगस्ट रोजी स्व. श्री. मणिक बाजीराव धर्माधिकारी सभागृह,आंबेवेस, परळी वैजनाथ येथे दि.११ ऑगस्ट २०२५ रोजी रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले आहे. सकाळी १० वा.पासुन शिबिराचा शुभारंभ होणार आहे. दिवसभर रक्तदात्यांना रक्तदान करता येणार आहे.

दरवर्षी वाढदिवसा निमित्त रक्तदान शिबीर आयोजित करण्यात येते. गेल्या १२ वर्षांपासुन सातत्याने घेण्यात येणारे व मोठ्या सहभागाचे शिबीर म्हणून हा सामाजिक उपक्रम परळीत अग्रेसर ठरलेला आहे.दरवर्षी नवनविन रक्तदात्यांना प्रोत्साहित करून रक्तदानाचे कार्य रूजविणे बाबत जागृती करणारा परळीतील हा उपक्रम आहे.या शिबिरात मोठ्या प्रमाणात सहभागी व्हावे असे आवाहन बाजीराव भैय्या धर्माधिकारी मित्र मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

# आ.मुंदडा यांच्या प्रयत्नातून गुंड गल्ली ते हानुमान गल्ली सिमेंट रस्त्याचे काम युद्ध पातळीवर सुरू!

**केज । प्रतिनिधी**

आ.नमिताताई मुंदडा यांच्या प्रयत्नातून गुंड गल्ली ते हानुमान गल्ली सिमेंट रोड चे काम युद्ध पातळीवर सुरू करण्यात आले आहे. गेल्या सहा महिन्यांपासून रखडलेल्या गुंड गल्ली, लोंढे गल्ली ते हानुमान गल्ली या कामाची आज सुरुवात झाली असून या तिन्ही गल्लीतील रहिवासी व महिला तसेच गुंड गल्ली गणेश मंडळ, संगम गणेश मंडळ लोंढे गल्ली केज, श्रीराम गणेश मंडळ व हानुमान गणेश मंडळ,हानुमान गल्ली केज तसेच सामाजिक, राजकीय कार्यकर्त्यांच्या माध्यमातून आमदार नमिता मुंदडा यांचा तात्काळ दखल घेऊन गुंड गल्ली ते हनुमान गल्ली सिमेंट कॉंक्रेट रस्त्याच्या कामाची सुरुवात केल्यामुळे सदरील भागातील नागरिकांच्या वतीने भव्य सत्काराचे



आयोजन केले आहे. अशी माहिती या भागातील नागरिकांच्या वतीने देण्यात आली आहे.सदरील रस्ता रहदारीसाठी अत्यंत आवश्यक आहे. या रस्त्याचे काम यश कंट्रक्शन कंपनी कडून केले जात आहे. सदरील रस्ता दर्जेदार होणार असल्यामुळे या भागातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

# तृतीयपंथांचे आयशा शेख यांच्यासोबत अनोखे रक्षाबंधन

**बीड । प्रतिनिधी**

राखी पौर्णिमेनिमित्त बीड शहरातील तृतीयपंथी समुदायाने पत्रकार आणि समाजसेविका आयेशा शेख यांच्यासोबत रक्षाबंधन साजरे केले. या विशेष प्रसंगी तृतीयपंथी व्यक्तींनी आयेशा शेख यांना राखी बांधून बंधुत्वाचा संदेश दिला, ज्यामुळे त्यांच्या सहकार्याची आणि समर्थनाची भावना प्रकट झाली. हा कार्यक्रम अनोख्या पद्धतीने आयोजित करण्यात आला, ज्यामध्ये न केवल सणाच्या पारंपरिक महत्वाला उजाळा देण्यात आला, तर तृतीयपंथी समुदायाच्या अधिकारांसाठी आयेशा शेख यांनी त्यांच्या कार्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे.

या उपक्रमाद्वारे तृतीयपंथी समाजाने एकत्र येऊन



एकत्रिततेचा शब्द आणि संदेश दिला, जेणेकरून समाजात सकारात्मक बदल घडवता येतील. हे एकत्रित पणे केलेले कार्य निसर्गाच्या किंवा आरोग्याच्या क्षेत्रात एकमेकांच्या मदतीसाठी नातेसंबंध साधण्यासाठी प्रभावी ठरले आहे. रक्षाबंधनाच्या या सणामुळे या समुदायाचा आपसी स्नेह, सहकार आणि बंधुत्वाची भावना आणखी दृढ झाली.

तृतीयपंथी व्यक्तींच्या विविधतेचा सन्मान करण्यासाठी हा उपक्रम खास होता, कारण यामुळे त्यांनी प्रकट केलं की त्यांना देखील प्रेम, स्नेह आणि बंधुत्वाचा अनुभव महत्त्वाचा आहे. या प्रकारच्या उपक्रमांनी समाजात तृतीयपंथी समुदायाची केवळ उपस्थिती नाही तर त्यांच्या आवाजाला ही महत्त्व दिलं आहे. त्यामुळे, या कार्यक्रमाने सर्वांद्वारे सहानुभूती आणि समजुतदारपणाची भावना विकसित केली आहे, जी दीर्घकालीन बदलांना प्रोत्साहन देते.

## गरुड दृष्टी सोशल मीडिया मॉनिटरिंगच्या मदतीने

# सायबर फसवणुकीतील १० कोटी रुपये पीडितांना परत

**नागपूर (वृत्तसंस्था)**–नागपूर पोलीस विभागाच्या 'गरुड दृष्टी' सोशल मीडिया मॉनिटरिंग व सायबर इंटेलिजन्स प्रकल्पाच्या मदतीने सायबर फसवणुकीतील १० कोटी रुपये पीडितांना परत करण्यात आले आहेत. नागपूर येथील पोलीस भवनात आयोजित विशेष कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या रकमेचे वितरण करण्यात आले.या प्रसंगी बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, समाजमाध्यमांवरून जातीय द्वेषमूलक चिथावणी देऊन दंगली घडवून आणणाऱ्या समाजविघातक लोकांना आळा घालण्यासाठी महाराष्ट्राकडे आता जगातील सर्वोत्तम यंत्रणा व तंत्रज्ञान उपलब्ध आहे. अशा लोकांना शोधून त्यांच्यावर तत्काळ कारवाई करण्यासाठी 'गरुड दृष्टी' हे टूल महत्त्वाची भूमिका बजावत आहे.मुख्यमंत्र्यांनी नागरिकांना सावध राहण्याचे आवाहन केले आहे. त्यांनी सांगितले की, सोशल मीडिया स्वतःचे विचार मांडण्यासाठी एक चांगले व्यासपीठ असले तरी काही समाजविघातक प्रवृत्ती द्वेष पसरवणे, धमक्या देणे, हेट स्पीच, फेक न्यूज आणि अंमली पदार्थांच्या तस्करीसाठी या प्लॅटफॉर्मचा वापर करतात.

# अहो साहेब...चोरांना पकडा कि!

## चंदनसावरगाव शिवारात विद्युत मोटार केबलीच्या चोरीचा धुमाकूळ



**केज : प्रतिनिधी**

शेतकरी अस्मानी व सुलतानी संकटाचा सामना करित असताना शेतातील विद्युत पंप,वायर चोरीच्या घटना वाढल्याने चिंतेत भर पडली आहे.केज तालुक्यातील चंदनसावरगाव शिवारातून शेतकऱ्यांच्या लाखोंच्या केबल वायरची चोरी गेल्या असून.चोरटे शेतशिवारांमध्ये मोठ्या चोऱ्या करीत असल्याने शेतकऱ्यांमध्ये भितीयुक्त वातावरण पसरले आहे.

केज तालुक्यातील चंदनसावरगाव रस्त्यालगत परिसरात शेतकऱ्यांचे विदयुत मोटार,स्टर्टर, पाईप,वायर चोरणारी मोठी टोळी सक्रिय झाली असुन शेतकऱ्यांचे शेतातील साहित्य चोरीचे प्रमाण वाढले असल्याने शेतकरी मेटाकुटीस आला आहे.अंदाजे सात ते आठ शेतकऱ्यांच्या शेतातून चोरट्यानी मागील महिन्यात मध्यरात्री शंकर शिवाजी तपसे यांच्या शेतातील सर्व सोलर प्लेट ची चोरी केली.तसेच दि. ८ ऑगस्ट २०२५ रोजी सायंकाळी पुरुषोत्तम तपसे यांच्या शेतातील दोन पाणबुडी मोटर व वायर,व्यंकटी तपसे यांच्या विहिरीतील मोटार,वायर,तसेच गणेश उकंडे यांच्या शेतातील पाणबुडी मोटार व वायर तर अशोक श्रीराम तपसे यांच्या शेतातील पाणबुडी मोटर,बाळासाहेब तपसे यांचे वायर असे चोरी झालेले आहे.

# प्रबोधनकार ठाकरे क्रिडा संकुलाच्या स्केटिंग खेळाडूंचा आंतरराष्ट्रीय पातळीवर दबदबा!



**मुंबई । प्रतिनिधी**


दक्षिण कोरियात नुकत्याच पार पडलेल्या २०व्या एशियन रोलर स्केटिंग चॅम्पियनशिप २०२५ मध्ये प्रबोधनकार ठाकरे क्रिडा संकुल ( पीकेटीएस ) विलेपार्ले येथील स्केटिंग खेळाडूंनी अतिशय उज्वल कामगिरी करत भारत आणि महाराष्ट्राचे नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर गौरवले आहे.

नायशा निशित मेहता वयोगट १४-१७, मुली सोलो डान्स सुवर्ण पदक,रिधम हर्षल ममाणिया वयोगट ११-१४, मुली सोलो डान्स सुवर्ण पदक ',कॅरोलिन फर्नांडिस रोलर डर्बी रजत पदक या उल्लेखनीय यशाबाबत संकुलाचे अध्यक्ष श्री अरविंद रमेश प्रभू म्हणाले,या सर्व खेळाडूंमध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाची गुणवत्ता आहे. त्यांच्याकडे सुवर्णपदक पटकावण्याची प्रचंड क्षमता असून, लवकरच त्यांच्या भारतीय संघात निवडीची घोषणा होईल, असा आम्हाला पूर्ण विश्वास आहे. या यशामागे संकुलाचे अध्यक्ष श्री अरविंद रमेश प्रभू, सचिव डॉ. मोहन अनंत राणे, तसेच स्केटींग असोसियट ऑफ महाराष्ट्राचे अध्यक्ष श्री पुष्पेंद्र कुमार सिंह, प्रशिक्षक व आंतरराष्ट्रीय दर्जाचे पंच श्रीमती आदेश सिंग, आणि कोरियोग्राफर श्री मोनिश कुमार कोटियन यांचे मोलाचे मार्गदर्शन आणि योगदान लाभले आहे.

# पक्षाचा विचार न करता मुस्लिम समाजाचा विचार करावा तरच नगराध्यक्ष मुस्लिम होऊ शकतो–शेख युनूस

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहराच्या नगराध्यक्ष पदासाठी पक्षाचा विचार न करता मुस्लिम समाजातील सर्व नेते, कार्यकर्ते, समाजातील विचारवंत यांनी एकत्र येऊन समाजाचा विचार करून एका योग्य उमेदवाराचे समर्थन करावे तरच नगराध्यक्ष पद मुस्लिम समाजाचे होईल.



अन्यथा समाजातील काही गुडघ्याला बाशिंग बांधून तयार असलेले अनेक भावी नगराध्यक्ष किंवा चमकोगीरी करणारे नेते जर स्वतःची पोळी भाजण्यासाठी जर नगराध्यक्ष पदाच्या शर्यतीत सर्व उभे राहतील तर '' दोन मांजरीच्या भांडणात माकडाचा फायदा झाल्याशिवाय राहणार नाही ''खरंच बीडच्या मुस्लिम नेत्यांना समाजाहिताचे काही घेणे देणे असेल तर त्यांनी एकत्र येऊन बैठक घेऊन एकच योग्य उमेदवार उभा करावा हीच अपेक्षा जनतेची आहे.

संपादकीय

# चॉकलेटी प्रेम

पूर्वी चॉकलेट म्हणजे 'चावलं की खालचे वरचे दोन्ही दात चिकटून दातखीळ बसवणारी चिकट वडी,' हीच एक ओळख असे. जोडीला मुख्यत्वे पेपरमेन्टच्या गोळ्या, सोबत लेमन आणि ऑरेंज या फक्त दोन स्वादांत येणाऱ्या, प्रामुख्याने मोठ्या माणसांना एसटी लागू नये म्हणून घ्यायच्या गोळ्या हाच लहानग्यांसाठी एकंदर खाऊ असायचा. त्यात अजून एक घरगुती प्रकारची गुळाची मोठी गोळी यायची. ती सकाळी तोंडात टाकली तर संध्याकाळपर्यंत केवळ टिकायची नाही तर तिचा आकारही तितकाच असायचा. फॉरेस्ट गम्प चित्रपटातील नायकाच्या वरील वाक्यानुसार बॉक्स ऑफ चॉकलेट्स असे काही आयुष्य नव्हते; 'असावा सुंदर चॉकलेटचा बंगला' अशी बालगाणी तेवढी होती.फारच मर्यादित असलेला चॉकलेटचा प्रकार आता मात्र दालनेच्या दालने भरून ओसंडून वाहतो आहे. पूर्वी दुकानदाराला लांबून बरणीतील हवे असलेले चॉकलेट मागावे लागायचे, आता मुलांच्या हाताशी चॉकलेट्स असतात. किलोकिलोची पाकिटे आणि तितक्याच बरण्या. पूर्वी खाऊच्या पैशातून किंवा कोणी पाहुणे येत असताना सोबत आणायचे म्हणून चॉकलेट मिळायचे. आता तर घरबसल्या हवे तसे, हवी तेवढी चॉकलेट्स घरी येतात.कोणत्याही सुपरस्टोअर मध्ये गेलात तर चॉकलेटचे विभागच दिसतात आणि त्यात उठून दिसते ते त्यांचे रंगीबेरंगी चकचकीत कव्हर. या चकचकीत कव्हरमुळे या चॉकलेटबद्दल भलतीच कल्पना होते. कव्हर भारी म्हणजे आतील चॉकलेटही फार भारी, असे वाटते. आपल्याकडे इतके महागडे सलून निघालेत, याचे कारण हे वेष्टनाला आलेले महत्त्वच कारणीभूत असावे. ते खूप फसवे असते, असे मी अनुभवांती निदान चॉकलेट्सबद्दल नक्की सांगू शकतो. मी वीसेक वर्षांपूर्वी चीनला गेलो होतो आणि शांघायवरून परतताना कार्यालयीन सहकाऱ्यांसाठी चॉकलेट्स आणली होती. तीही अशी भारी, उत्तम, कलरफुल आणि चमकदार होती. ती मी तेथील अक्षरशः अर्धा किमी लांबी भरेल इतक्या विशाल चॉकलेटसाठीच्या रांगांतून घेतली होती. ती खाऊन आमचे एक वरिष्ठ सहकारी म्हणाले की, ही चॉकलेट्स बहुधा चीनमध्ये आर्थिक सुधारणा सुरू व्हायच्या आधी तयार केलेली असावीत. असो... त्यामुळे ज्या प्रकारे आपण पुस्तकाचे मूल्यमापन त्याच्या मुखपृष्ठावरून करू नये, असे म्हणतो, तेच तत्व चॉकलेटलाही लागू करावे. कारण, त्यातूनच खोटी आश्वासने देणाऱ्याला आपण 'मला चॉकलेट देऊ नको' असा वाक्प्रचार तयार झाला.आज असंख्य आकार, प्रकार, स्वाद आणि देशांतील चॉकलेट्स सगळीकडे उपलब्ध असतात. अलीकडे अर्धा डझन अंड्याच्या बॉक्ससारखे गिफ्टसाठी स्वीस चॉकलेट नामक एक तरी बॉक्स लोकांच्या फ्रीजमध्ये असतो. चॉकलेटमध्ये सर्व संवेदनांचा वापर होतो. ते कसं दिसतं, ते कसं 'वाजतं' म्हणजे त्याचा चावल्यावर आवाज कसा येतो, त्याचा गंधही महत्त्वाचा आणि पुढे स्पर्श आणि अर्थात चव. परंतु सर्वाधिक महत्त्वाचे हे त्याचे पॅकेजिंग आहे, हे लक्षात ठेवायला हवे. कारण, सर्वप्रथम दिसणारे चॉकलेटचे कव्हरच आपल्याला पावलोचा कुत्रा बनवते.चॉकलेट ही फक्त लहान मुलांना दिली जाणारी चीज होती. पण हळूहळू या इच्छा किशोरवयीन मुलापर्यंत टिकून राहिल्या. दरम्यानच्या काळातील काही संस्मरणीय जाहिरातीतून एक विशिष्ट कंपनीचे चॉकलेट भिन्न लिंगी व्यक्तीला दिले की प्रेम भावना व्यक्त झाली, अशा संकेतापर्यंत या चॉकलेटचा प्रवास झाला. (अर्थात काही भोट माणसांना हे सांकेतिक अर्थ न कळल्यामुळे त्यांच्या आयुष्यात झालेले फायदे किंवा नुकसान याच्या कहाण्या वेगवेगळ्या आहेत.) खरे चॉकलेट खूप कडू असते आणि त्याच्यामध्ये खूप साखर टाकून त्यात नसलेला गोडवा निर्माण करण्यात आला आहे, हे कळेपर्यंत खूप काळ निघून गेलेला असतो.चांगले चॉकलेट हे महागडे प्रकरण असते. त्यामध्ये एक्सक्लुझिव्हनेस म्हणजे मोजक्याच ठिकाणी मिळणारी, मोजकेच जण बनवत असलेली अशी विविध गटवारी असते. काही चॉकलेट्स मोठ्या प्रमाणात बनवली जात आहेत, असे दिसत असले तरी चांगली चॉकलेट्स अजून मोजक्या कसबी हातांच्या करामती आणि ग्राहकांचे खिसे या गणितात अडकलेली आहे. त्यामुळे यात नियमित, उत्तम आणि अलिशान असे गट आहेत. खास भेट म्हणून दिली जाणारी चॉकलेट्स ही कोणत्या तरी हातांतूनच घडलेली असतात. त्यामध्ये सॉफ्ट कोअर, लिक्विड अशा करामतींसोबत रमयुक्त वगैरे अशी त्याची खास कौशल्यपूर्ण वैशिष्ट्ये असतात. पूर्वीचे चॉकलेट केवळ चघळता यायचे, आताचे चॉकलेट खाता येते, पिता येते; थंड किंवा गरम, कसंही.काही वर्षांपूर्वी ह्या चॉकलेट्सचा विस्तार मिठाईपर्यंत करण्यात आला आणि दिवाळी सणाशी त्याची सांगड घालून चॉकलेटचे बाल आणि युवा यांच्यापुरते असलेले क्षेत्र व्यापक करण्यात आले. त्यामुळे मुलांसोबत मुलांची आई आणि बाबाही चॉकलेट खाऊ लागले. हे चॉकलेट बारच्या रूपात असतात. त्यामुळे चर्चेत असलेल्या कालखंडात जसे प्रत्येकाच्या घरी 'बार' तयार झाले, तसे हे बारही फ्रीजमध्ये जमा व्हायला लागले. टोल नाक्यापासून मॉलच्या काउंटरपर्यंत सर्रास चॉकलेटं दिली जाऊ लागली.

# सोशल मीडिया वापरा, पण माणुसकी जीवंत ठेवा!

एखाद्या सोशल नेटवर्क सेवेचा पाया म्हणजे एखाद्या व्यक्तीने त्या सोशल नेटवर्किंग संकेतस्थळावर तयार केलेले प्रोफाईल पान अर्थात माहितीचे पान असते. एखाद्या व्यक्तीचा इंटरनेटवरील आविष्कार, रूप किंवा अवतार म्हणजे हे प्रोफाईल पान होय. सोशल नेटवर्किंग संकेतस्थळे ही व्यक्तीला अशा प्रकारची प्रोफाईल बनवणे, त्या संकेतस्थळांवरील इतर व्यक्तींशी ओळख व मैत्री करणे तसेच विविध माहितीची देवाण-घेवाण करणे आदींची संधी देतात. अशा या जीवलग सोशल मीडियाबद्दल रोचक माहिती श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजी- अलककार देत आहेत... संपादक.



इंटरनेटवर उपलब्ध असणारा, विविध व्यक्तींशी संपर्क साधू देणारा व ते जपू देणारा मंच म्हणजे सोशल नेटवर्क सेवा होय. सोशल नेटवर्क अथवा सामाजिक जाळे म्हणजे असे गट जेथे समान विचारांची, सारख्या आवडीनिवडींची माणसे एकत्र येतात. या संज्ञेत जरी प्रत्यक्ष भेट अथवा थेट संवाद अपेक्षित असला, तरी ही संज्ञा इंटरनेटवरील सेवेसही लागू पडते. ही सेवा मुख्यतः इंटरनेटवरील विविध संकेतस्थळांच्या मार्फत पुरवली जाते. अशा संकेतस्थळांना सोशल नेटवर्किंग संकेतस्थळे असे म्हणतात. सोशल नेटवर्किंग व सोशल नेटवर्क या व्याख्या अनेकदा समानार्थी वापरल्या जातात. परंतु नेटवर्किंग या शब्दात अनोळखी व्यक्तींशी देखील नाते जोडणे अपेक्षित आहे; तर सोशल नेटवर्क या शब्दाचा अर्थ व्यापक असून त्यात खऱ्या आयुष्यातील ओळखीच्या लोकांशी देखील इंटरनेटवर नाते जोडणे अपेक्षित असते. सुमारे २०० वर्षांपूर्वी पृथ्वीतलावर जेवढे लोक नव्हते, तेवढे आज एका फेसबुक नामक सोशल नेटवर्कवर आहेत. लोक भाषा, सीमा सर्व विसरून एकमेकांशी जोडण्याच्या भावनेने सोशल नेटवर्कचा भाग होतात. काही लोक हे जुन्या मित्र-मैत्रिणींच्या संपर्कात राहण्यासाठी सोशल नेटवर्कवर येतात.

काही तज्ज्ञांचे असे म्हणणे आहे, की सिक्सडिग्रीज.कॉम हे पहिले सोशल नेटवर्किंग संकेतस्थळ आहे. हे संकेतस्थळ इ.स.१९९७ साली सुरू झाले. सर्वप्रथम येथे सदस्यांना प्रोफाईल-माहिती पान उघडण्याची व मित्रमंडळ तयार करण्यास मुभा दिली. त्यानंतर सन १९९८ साली मित्रमंडळ सूची शोधण्याची मूभा दिली. मात्र या संकेतस्थळाला फारशी प्रसिद्धी मिळाली नाही. परंतु या संकेतस्थळाच्या निर्मितीआधी देखील या प्रकारचा ऑनलाईन संवाद अथवा देवाण-घेवाण घडत असे. प्रोफाईल व संवाद साधणे हे जरी या सेवेचे मूळ उद्दिष्ट असले, तरी सोशल नेटवर्किंग संकेतस्थळांची सुरुवात वेगवेगळ्या हेतूंनी झाली. उदा- सायवर्ल्ड हा कोरियन परिसंवाद मंच होता. स्कायरॉक ही सुरुवातीला फ्रेंच ब्लॉगिंग सेवा होती. सोशल नेटवर्किंग संकेतस्थळांवरील प्रत्येक सदस्याला आपल्या माहितीची काही प्रमाणात गुप्तता राखता येते. मात्र यांवर मर्यादा आहेत. उदा- फेसबुकवरील सदस्याने एखादे ॲप्लिकेशन वापरायच्या आधी एक सूचना येते. त्या सूचनेनुसार त्या सदस्याची माहिती व फोटो वापरण्याची परवानगी फेसबुकला दिली जाते. मात्र ही माहिती कशासाठी वापरणार याची कल्पना सदस्याला नसते. त्याचप्रमाणे फेसबुकवर एखाद्या सदस्याने जरी आपल्या फोटोंविषयी गुप्तता पाळली असेल, तरी त्या सदस्याचे नाव फेसबुकवर शोधले असता काही फोटो दिसतात. हे फोटो मुख्यत्वे त्या सदस्याच्या मित्रमंडळींनी प्रकाशित करून त्यात सदस्याला टॅग केलेले असते. तसेच सर्व सदस्यांची सर्व माहिती त्या संकेतस्थळांवर साठवली जाते व अनेकदा मोठमोठ्या कंपन्यांना विकली जाते. त्यामुळे गुप्तता ही सोशल नेटवर्किंग संकेतस्थळांविषयीची मुख्य चिंता आहे.

१) प्रोफाईल- माहिती पान: जवळजवळ सर्व सोशल नेटवर्किंग संकेतस्थळांचा मूलभूत घटक म्हणजे माहिती पान होय. या पानावर त्या संकेतस्थळाच्या सदस्याची माहिती प्रकाशित केली जाते. उदा- नाव, वय, लिंग, व्यवसाय, निवास स्थान, आवडीनिवडी इत्यादी. अनेकवेळा सदस्य एखादा फोटो देखील प्रकाशित करू शकतो. ही सर्व माहिती त्या संकेतस्थळावर साठवली जाते. जर कोणी त्या सदस्यास अथवा त्याची माहिती शोधण्याचा प्रयत्न केला तर ते माहिती पान त्या व्यक्तीस दिसते. सोशल नेटवर्किंग संकेतस्थळावर अशी प्रोफाईल बनवण्यास किमान वयाची पात्रता लागते. ही पात्रता प्रत्येक संकेतस्थळानिशी बदलते. २) ओळख- संपर्क व मैत्री: सोशल नेटवर्क सेवेचा मुख्य उद्देश इंटरनेटवर संपर्क जाळे निर्माण करणे हा आहे. त्यामुळे सर्व सोशल नेटवर्किंग संकेतस्थळांचा वापर प्रामुख्याने इतर व्यक्तींशी ओळख व मैत्री करण्यात केला जातो. हा सर्व सोशल नेटवर्किंग संकेतस्थळांचा महत्त्वाचा घटक आहे. या संपर्कजाळ्याला प्रत्येक संकेतस्थळावर विविध नावांनी ओळखले जाते. उदा- फेसबुक, ओर्कुटवर यास फ्रेंड्स- मित्र असे म्हणतात. तर ट्विटरवर त्यास फॉलोवर्स- अनुयायी असे म्हटले जाते. ३) घोषणा व संदेश: या संकेतस्थळांवर संपर्क साधण्याचे मुख्य साधन म्हणजे घोषणा असते. प्रत्येक सदस्य कोणतीही घोषणा प्रकाशित करू शकतो. यास इंग्रजीत स्टेटस मॅसेज असे म्हणतात. सदस्याने प्रकाशित केलेल्या घोषणा त्या सदस्याच्या त्या संकेतस्थळावरील सर्व मित्रमैत्रिणींना दिसतात व हे मित्रमैत्रिणी त्यावर आपली मते मांडू शकतात. त्याचप्रमाणे एकमेकांना संदेश पाठवण्याची सोय देखील येथे उपलब्ध असते. ४) संवाद: सोशल नेटवर्किंग संकेतस्थळांचा वापर संवाद साधण्यास म्हणजेच चॅट करण्यासाठी सुद्धा करतात. सोशल नेटवर्क सेवा सुरू होण्यापूर्वी देखील अशा प्रकारचे चॅटिंग इंटरनेटवर केले जात असे. ५) इतर तंत्रज्ञानाशी मेळ: या सेवेची व संकेतस्थळांची लोकप्रियता पाहता अनेक मोबाईल फोन कंपन्यांनी ही सेवा मोबाईलवरही उपलब्ध केली आहे. म्हणजेच सोशल नेटवर्किंग संकेतस्थळांवर प्रवेश करणे संगणकापुरते मर्यादित नाही. मोबाईल फोनवरून देखील या संकेतस्थळांवर प्रवेश करता येतो. ६) प्लिकेशन्स: माहिती पान व संपर्कजाळे यांखेरीज दुसरे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे प्लिकेशन्स होय. सोशल नेटवर्किंग संकेतस्थळे सदस्याला विविध प्लिकेशन्सही पुरवतात. त्यांचा वापर करून सदस्याला आपले माहिती पान सजवता येते. आपल्या फोटोमध्ये बदल घडवता येतात, विविध खेळ खेळता येतात. ही प्लिकेशन्स प्रत्येक संकेतस्थळानुसार बदलतात. एखाद्या संकेतस्थळाच्या लोकप्रियतेवर याचा खुप मोठा प्रभाव पडतो. ७) व्यावसायिक उपयोग: अनेक व्यावसायिक कंपन्या व संघटना या संकेतस्थळांचा वापर आपल्या कंपनीविषयी माहिती पुरवण्यास करतात. विविध कंपन्या सोशल नेटवर्किंग संकेतस्थळांवर आपले प्रोफाईल प्रकाशित करतात. ८) जाहिराती: सोशल नेटवर्किंग संकेतस्थळांची लोकप्रियता व विस्तार पाहता अनेक व्यावसायिक कंपन्या व उद्योग धंदे या संकेतस्थळांचा वापर जाहिरातींसाठी सुद्धा करतात. उदा- इतर संकेतस्थळांच्या जाहिराती, बाजारातील नवीन वस्तूंच्या जाहिराती, नोकऱ्यांच्या जाहिराती इत्यादी. संकेतस्थळांना या जाहिरातदारांकडून प्रचंड पैसा मिळतो व त्यावरून ते नफा कमवतात.

बहुतेक वेळा अनेक लोक अशाच व्यक्तींशी ऑनलाईन मैत्री करतात, की ज्यांना ते प्रत्यक्षात ओळखतात किंवा कधी तरी भेटलेले असतात. तरीही सोशल नेटवर्किंग संकेतस्थळे प्रत्येक सदस्यास वेगवेगळ्या अनोळखी व्यक्तींशी देखील मैत्री करण्याची संधी देतात. सदस्यांचे संपर्कजाळे झळकवणे हा सोशल नेटवर्किंग संकेतस्थळांचा मुख्य गुणधर्म आहे. एखाद्या सोशल नेटवर्क सेवेचा पाया म्हणजे एखाद्या व्यक्तीने त्या सोशल नेटवर्किंग संकेतस्थळावर तयार केलेले प्रोफाईल पान अर्थात माहिती पान असते. एखाद्या व्यक्तीचा इंटरनेटवरील आविष्कार किंवा रूप किंवा अवतार म्हणजे हे प्रोफाईल पान होय. सोशल नेटवर्किंग संकेतस्थळे व्यक्तीला अशा प्रकारचे प्रोफाईल बनवणे, त्या संकेतस्थळांवरील इतर व्यक्तींशी ओळख व मैत्री करणे तसेच विविध माहितीची देवाण-घेवाण करणे आदींची संधी देतात. सोशल नेटवर्क सेवेमुळे एकाच वेळी अनेक लोकांशी संपर्क व ओळख ठेवता येते. यात वेळ, स्थान इत्यादी गोष्टी आड येत नाहीत. मात्र या ओळखींचा प्रत्यक्ष आयुष्यात उपयोग होतो की नाही, हे सांगणे कठीण आहे. सोशल नेटवर्किंग संकेतस्थळांवरील माहितीचा वापर अनेक कंपन्या, अर्थवित्तीय संस्था, मोबाईल सेवा पुरवणाऱ्या कंपन्या आदी करतात. अनेक वेळा या माहितीचा गैरवापरही केला जाऊ शकतो. सोशल नेटवर्किंग संकेतस्थळांचे वाढते जाळे व लोकप्रियता तसेच लोकांवर होणारा परिणाम हे अनेक अभ्यासकांचे लक्ष वेधत आहे. पत्र व पत्रपेट्यांना केव्हाच बाद केले आहे. आता तर वर्तमानपत्रेही शेवटच्या घटका मोजू लागले आहेत. वाढत्या लोकप्रियतेबरोबरच इंटरनेट व सोशल नेटवर्किंग संकेतस्थळांचे व्यसनही वाढत आहे. अल्पवयीन मुलांसह तरुणाई खेळाच्या अत्याधिक आहारी गेली आहे. ती सर्व आईवडील किंवा प्रिय व्यक्तीलाही जुमानत नाहीत. व्यत्यय आणला म्हणून प्राणघातक हल्ले केल्याच्या प्रसंगी जीव घेतल्याच्या अनेक घटना घडल्या आहेत. काही ठिकाणी तर अशा वेड्यापिस्या मुलांनी आत्महत्यांचाही पर्याय निवडला आहे, हे येथे चिंतनीयच!

!! समाज माध्यमांचा उपयोग सामाजिक स्तर उंचावण्यासाठीच व्हावा, यास्तव सर्वांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

# विसर्जनाची अडचण



यंदाचा गणेशोत्सव आता जेमतेम महिन्यावर आलेला असताना मूर्ती विसर्जनाबाबत निर्माण झालेला पेच मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे संपुष्टात आला आहे. गणेशोत्सवाची वाढत चाललेली लोकप्रियता, जल्लोषात उत्सव साजरा करण्याची भक्तांची मानसिकता आणि त्यातूनच मूर्तींच्या उंचीबाबत निर्माण झालेली चढाओढ यातूनच गणेशोत्सव, नवरात्रोत्सव तसेच माघी गणेशोत्सवातील मूर्ती विसर्जनाबाबत समस्या निर्माण झाली होती. गणेश मूर्तींची वाढती उंची हा भाविकांच्या उत्साहाचा विषय असला तरी विसर्जन मिरवणुकीसाठी उंच मूर्ती मंडपातून काढणे, विसर्जनस्थळी वाजतगाजत नेणे, रस्त्यादरम्यान होणारी वाहतूक कोंडी, भाविकांचे नृत्य, गणेश भक्तिपर गाण्यांचा जल्लोष यामध्ये मंडपातून निघालेली मूर्ती वाहनातून विसर्जनस्थळी नेईपर्यंत मूर्ती सांभाळणाऱ्या कार्यकर्त्यांना करावी लागणारी तारेवरची कसरत हे एकप्रकारचे अग्निदिव्यच असते. दरवर्षी उंच मूर्ती विसर्जित करताना महापालिका कर्मचारी, सुरक्षा रक्षक, मंडळाचे पदाधिकारी, सदस्यांना द्राविडी प्राणायम करावा लागतो.

प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींच्या उंचीवरून वादास सुरुवात झाली आहे. पीओपीच्या मूर्तींना बंदी घालण्यात आली असली तरी विविध कारणांमुळे बंदीच्या अंमलबजावणीला अजून यश आलेले नाही. पीओपींच्या मूर्तींचा वाद हा अलीकडच्या गेल्या काही वर्षांमध्ये निर्माण झालेला आहे. मुंबई उच्च न्यायालयाने ३० जानेवारी २०२५ पीओपीपासून बनवलेल्या मूर्ती आणि त्यांचे जलसाठ्यात विसर्जन करण्याविरुद्ध अंतरिम आदेश दिला आणि केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या (सीपीसीबी) मार्गदर्शक तत्त्वांचे काटेकोरपणे पालन करण्याचे आदेश दिले. तथापि, न्यायालयाने आदेश देऊनही बाजारात पीओपीच्या मूर्ती आजही निर्माण होत आहेत. पीओपींच्या मूर्तींमुळे जलप्रदूषण होत असल्याने केंद्र सरकारने त्या मूर्तींच्या विसर्जनास वारंवार आक्षेप घेत शाडूच्या मूर्ती अथवा अन्य पर्यायाचा शोध घेण्यास यापूर्वीच सुचविले आहे. पीओपी पर्यावरणपूरक नाही. ते नद्यांमध्ये, पाण्यात विरघळू शकत नाही. त्यामुळे नद्या उथळ होतात. दुसरीकडे तलाव किंवा विहिरीत विसर्जन केले, तर नैसर्गिक पाण्याचे स्रोत खराब होतात. त्यामुळे या मूर्तींना नाही तर त्यांच्या विसर्जनाला व त्यातून निर्माण होणाऱ्या जलप्रदूषणाला केंद्र सरकारने वारंवार आक्षेप घेतला आहे. केंद्राचा हेतू पर्यावरणपूरक असला तरी अनेकजण रोजगाराला मुकतील, बेरोजगार होतील, अनेकांना कर्जबाजारी व्हावे लागेल अशा स्वरूपाचे आक्षेप घेत अनेकांनी न्यायालयाचे दरवाजे ठोठावले आहेत. २०१२ पासून केंद्र सरकार पीओपी मूर्तींच्या विरोधात असले, तरी भाविकांची पीओपी मूर्ती खरेदी करण्याची मानसिकता, सार्वजनिक गणेशोत्सव व नवरात्रोत्सव मंडळाचाही याच मूर्ती खरेदीबाबतचा आग्रह यामुळे बाजारात पीओपीच्या मूर्तींवर बंदी येणे तूर्तास तरी शक्य दिसत नाही. धर्म आणि रूढी-परंपरांच्या नावाखाली पर्यावरणाचा विचार सोडून देणे आणि अविचारी पद्धतीने उत्सव साजरे करणे हे मुळात चुकीचे असले तरी आजही कोणी हे समजून घेत नाही, हीच खरी शोकांतिका आहे. मूर्ती बनवणाऱ्यांना मूर्ती बनवण्यासाठी नैसर्गिक, विघटनशील आणि पर्यावरणपूरक कच्च्या मालाचा वापर करण्यास कोणाकडूनही प्रोत्साहित केले जात नाही. त्यातून पीओपी मूर्ती विसर्जनावरून केंद्र सरकार व मूर्ती उत्पादक यांच्यातील वाद उच्च न्यायालयात गेला. न्यायालयाने या वादावर तोडगा काढला असला तरी हा तोडगा हंगामी स्वरूपाचा आहे. कायमस्वरूपी नाही. येणाऱ्या माघी गणेशोत्सवापर्यंतच या तोडग्याची मुदत आहे. सहा फुटांवरील गणेश मूर्तींचे समुद्रात, तर त्याखालील मूर्तींचे कृत्रिम तलावांमध्ये विसर्जन करण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. पाच फुटांपर्यंतच्या मूर्ती विसर्जनाबाबत कृत्रिम तलावामध्ये न्यायालयाने आदेश दिले असले तरी मुंबई तसेच मुंबई सभोवतालच्या ठाणे, कल्याण-डोंबिवली, नवी मुंबई, पनवेल या एमएमआरए क्षेत्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांवरील जबाबदारी वाढविली आहे. पाच फुटांपर्यंतच्या गणेश मूर्तींच्या विसर्जनासाठी कृत्रिम तलावाची उंची व खोली याचाही स्थानिक प्रशासनाला प्राधान्याने विचार करावा लागणार आहे. गणपतीबाप्पा हा श्रद्धेचा विषय आहे. या मूर्तींचे विसर्जन पारंपरिक पद्धतीने व्हावे असा त्यांचा आग्रह असला तरी गणेश भक्तांची अलीकडच्या काळात विसर्जनाबाबतची मानसिकता बदलली आहे, हा खरोखरीच बदल मानावा लागेल. वाहतूक कोंडी, परिसरापासून काही अंतरावर विसर्जन स्थळ, विसर्जन स्थळी असणारी गर्दी व त्यातून विसर्जनास होणारा विलंब आणि अनेकदा विसर्जनासाठी हमखासपणे असणारी वरुणराजाची हजेरी यामुळे घराजवळच उपलब्ध असणाऱ्या कृत्रिम तलावांचा पर्याय गणेश भक्तांनी स्वीकारला आहे. यात विसर्जनादरम्यान कृत्रिम तलावांमध्ये मूर्ती विसर्जित करण्यास चांगला प्रतिसाद मिळू लागला. पीओपींच्या मूर्ती विसर्जनावर न्यायालयाने दिलेला निर्णय ही केवळ वरवरची मलमपट्टी आहे. कोणत्याही समस्येवर ठोस तोडगा काढणे आवश्यक असते. अन्यथा त्या समस्येचा भस्मासूर होण्यास फारसा वेळ लागत नाही. पीओपींच्या मूर्तींमुळे पर्यावरणाची होणारी हानी, जलप्रदूषण या गोष्टींकडेही कानाडोळा करून चालणार नाही. त्या सत्यतेचा स्वीकार करण्याची मानसिकता आपणास स्वीकारावी लागणार आहे. मूर्ती मोठ्या उंचीची असो व छोटी असो, गणराया सर्वांमध्येच सामावलेले. भक्त गरीब असो वा श्रीमंत, गणराया आशीर्वाद देताना दुजाभाव दाखवत नाही. उंच मूर्ती हा प्रतिष्ठेचा विषय बनविण्याच्या संकल्पनेला कोठे तरी छेद द्यावाच लागेल. विषय श्रद्धेचा असला तरी त्यातून निर्माण होणाऱ्या परिणामांचाही कधी तरी विचार करावाच लागेल. नदी, तलाव, समुद्र या नैसर्गिक पर्यायांशिवाय अन्य पर्यायांचा शोध घेण्यास आपणास मर्यादा पडल्या आहे. शाडूच्या गणेशमूर्तींचे लवकर विसर्जन होते. ती माती आपण शेतामध्ये, बागेमध्ये, उद्यानांमध्ये वापरू शकतो. पीओपी मूर्तींबाबत ते शक्य नाही. पीओपी मूर्तिकारांना माघी गणेशोत्सवापर्यंत न्यायालयीन निर्णयामुळे तूर्तास दिलासा मिळाला आहे.

# बँगलोर अंतरराष्ट्रीय लघु चित्रपट महोत्सवात पोहचला डियर पँथर' जागतिक पातळीवरील ३,२१३ नोंद लघुपटातून ३१ ची झाली निवड

**बीड । प्रतिनिधी**

'नांगेली' सारख्या वास्तववादी नाटकाच्या यशानंतर धनंजय साबळे यांचा बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या चतुर्थश्रेणी कामगारांच्या समस्या आणि त्याचे निराकरण या विषयावर 'डियर पँथर' हा १५ मिनिटांचा लघुपट त्यांनी लिहिला आणि दिग्दर्शित केला आहे. या लघुपटाची नुकत्याच भारतातील एकमेव ऑस्कर पुरस्कार अधिकृत 'बँगलोर अंतरराष्ट्रीय लघु चित्रपट महोत्सवात' निवड झाली. महाराष्ट्रातून 'डियर पँथर' हा मराठी भाषिक लघुपट जागतिक ऑस्कर पुरस्कार श्रेणीमधील महोत्सवात दाखवला जाणार आहे. जागतिक स्तरातून ३,२१३ पर्यंत आलेल्या नोंदणी मधून २६६ चित्रपट,माहितीपट,लघुपट निवडल्या गेलेत आणि त्यातून केवळ ३१ हे लघुपट बंगलोरच्या या महोत्सवात निवडक ठरले आहेत.

अर्हत प्रोडक्शन मुंबई या चित्रपट निर्मिती संस्थेचे निर्माते धनंजय साबळे आणि नितीन शिंदे यांच्या 'डियर पँथर' ऑस्कर पुरस्कार अधिकृत बंगरुळू इंटरनॅशनल शॉर्ट फिल्म फेस्टीव्हल सारख्या नामांकित चित्रपट महोत्सवात निवड होणं ही संपूर्ण मराठी सिनेसृष्टीसाठी ही अभिमानाची बाब आहे. भारतातील हा एकमेव असा चित्रपट महोत्सव आहे जो ऑस्कर पुरस्कार अधिकृत आहे. या महोत्सवा बरोबर जर्मनी इथल्या कोबानी इंटरनॅशनल फिल्म फेस्टीव्हल जर्मनी चित्रपट महोत्सवात देखील उपांत्यपूर्व फेरी या श्रेणीत 'डियर पँथर' लघुपटाची निवड झाली आहे. या अगोदर हा लघुपट छत्रपती संभाजीनगर येथील दहाव्या अजिंठा-वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात 'स्पेशल स्कीनिंग' या कॅटेगरी मध्ये दाखविला गेला. त्याच बरोबर एप्रिल मध्ये चेन्नई येथील नामांकित पीके रोझी फिल्म महोत्सवात या लघुपटाची फार सराहना झाली होती. पीके रोझी या चित्रपट महोत्सवात लघुपटाची दक्षिणात्य दिग्दर्शक पा. रणजिथ यांनी चित्रपटाची फार प्रशंसा केली.

मुंबईतील उच्च शिक्षीत कामगारांवर केंद्रीत फिल्म : 'चित्रपटाचा नायक 'पँथर' एक पीएचडी धारक विद्यार्थी आपल्या हक्काच्या घरासाठी स्थानिक महानगरपालिकेशी हक्काची लढाई लढतोय. 'पँथर' हे नाव सरकारी अन्यायाविरुद्ध व्यापक लढ्याचे प्रतिक म्हणून लेखक दिग्दर्शक धनंजय साबळे यांनी वापरलेले आहे. महानगर पालिकेत आपल्या वडिलांच्या जागेवर चतुर्थश्रेणी पदावर काम करणारा पँथर हा युवक सरकारकडे आपल्या हक्काच्या घरासाठी वारंवार मागण्या करतो पण त्याच्या मागण्याकडे




जाणीवपूर्वक दुर्लक्ष केलं जातं. तर दुसरीकडे चाळीत राहणारी एक विद्यार्थिनी जिला सीए होण्याचं स्वप्न आहे पण राहायला छप्पर हवं त्यामुळं नाईलाजाने उच्चशिक्षणाचं स्वप्न बाजूला सारून चतुर्थश्रेणी या पदावर सफाई कर्मचारी म्हणून कामाला सुरुवात करते. इतकी वर्षे काम करून सुद्धा एकाही चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्याला आपलं हक्काचं घर कधीच मिळालेलं नाही, किंवा या तुटपुंज्या पगारावर तो स्वतःचं घर मुंबई सारख्या शहरात विकत घेऊ शकत नाही. सरकारकडून आरोग्य सेवेचा हवा तसा लाभ मिळत नाही. हा प्रवासावर यातून प्रकाश टाकण्यात आला आहे. या परिस्थितीत न्याय मिळवण्यासाठी पँथर चा संघर्ष यातून दाखवण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. याला लोकनाथ यशवंत यांची 'साखळी' नावाची कवितेतून मांडलेल्या संघर्ष आणि वास्तव याची जोड देण्यात आली आहे. आपल्या छत्रपती संभाजीनगरचा धनंजय साबळे यांने धनंजय साबळे यांनी या लघुपटाचे लेखन तसेच दिग्दर्शन केले असून कलाकार म्हणुन धनंजय साबळे, शोनाली ढाकणे-साबळे, दिपाली बडेकर, नितीन शिंदे, अश्लेषा गाडे, अतिश आखाडे, अंकुश चौरपगार, अमर लहाने, वनिता कदम, विलास तांबे यांनी भूमिका साकारली आहे. या चित्रपटाचे लेखक-दिग्दर्शक धनंजय साबळे हे मुळ छत्रपती संभाजीनगर येथील रहिवासी असून त्यांनी मिलिंद विज्ञान महाविद्यालयातून उच्चमाध्यमिक शिक्षण पूर्ण करून पुढील पदवी, पदव्युत्तर शिक्षण मुंबईतील सेंट झेवीयर्स इन्स्टीट्युट ऑफ कम्युनिकेशन मुंबई आणि मास्टर थिअटर आर्टस, मुंबई विद्यापीठातून पूर्ण केले आहे.

डियर पँथर : चित्रपट संस्था - अर्हत निर्माता धनंजय साबळे, नितीन शिंदे, चित्रपटाचे नाव- डियर पँथर लेखक, दिग्दर्शक - धनंजय निर्मलक्ष्मण साबळे, छायाचित्रण- अजय सागर, पार्श्वसंगीत - प्रतिक बोरसे

व्हीएफएक्स निर्माता- स्वप्नील सरगडे, आर्ट- गौरव ओव्हळ, रोहित मोरे, हेमंत वाल्वी, एडिटर- शोनाली ढाकणे साबळे, आकाश मोरे पोस्टर आणि जनसंपर्क- जय कुंभारे, अथर्व बारापत्रे तसेच बाल कलाकार आराध्या अमित जाधव, शौर्या संदेश कदम व समस्त बौद्धजन पंचायत समिती, शाखा क्र. १२८, कासारवाडी, दादर, मुंबई यांचे सहकार्य लाभले आहे.

**अशी सूचली संकल्पना**

एकदा मोबाईल वर स्क्रोल करत असताना एक बातमी नजरेस पडली. चेंबूर-गोवंडी भगर ड्रेनेज मध्ये पडून दोन सफाई कर्मचाऱ्यांचा मृत्यू. अशा मथळ्याखाली ती बातमी होती आणि त्याचं वेळेस चंद्रयान लाँच हिण्याची लगबग आणि उत्साह सुरु होता. मग डोक्यात विचार आला कि एकीकडे चंद्रयान चं प्रक्षेपण करून भारत प्रगती पथाकडे जातोय आणि दुसरीकडे जमिनीवरचे प्रश्न सोडवण्यात अजूनही दिरंगाई, दुर्लक्ष केलं जातंय.? आणि ह्या झालेल्या त्रासातूनच लघुपट करायचा विचार मनात घर करून राहिला. या संकल्पणेतून पँथर पुढे आल्याचे दिग्दर्शक धनंजय साबळे सांगतात.

# नवोदय विद्यालयात आदिवासी गौरव दिवस व रक्षाबंधन सण उत्साहात साजरा

**मोलगी ।रविंद्र वळवी**

अक्कलकुवा येथील जवाहर नवोदय विद्यालयात रक्षाबंधन व विश्व आदिवासी गौरव दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.सर्व प्रथम आदिवासी गौरव दिना निमित्ताने आदिवासी क्रांतिकारकांच्या प्रतिमांचे पुजन करुन त्यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य जी. एम. मस्के हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणुन वरिष्ठ शिक्षक विलास पाटील, संजय पाचोरे, सुनिल लोहार आदीं उपस्थित होते. यावेळी प्राचार्य जी.एम.मस्के यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना आदिवासी गौरव दिनाचे महत्व विषद करत आदिवासी समाजाचा इतिहास, वैभवशाली परंपरा, संस्कृती आणि गौरवशाली वारसा याबद्दल सविस्तर माहिती देत विद्यार्थ्यांनी आपल्या जबाबदाऱ्या आणि हक्क या प्रती सजग रहावे असे सांगितले. यावेळी संजय पाचोरे, धैर्यशील जगदाळे, आशिष शर्मा यांनी ही आदिवासी दिना निमित्ताने मार्गदर्शन केले. तसेच वेदांत, सर्वज्ञ, प्रेमकुमार, या विद्यार्थ्यांनी अभ्यास पुर्ण भाषणे



दिलीत. यावेळी विद्यार्थ्यांनी आदिवासी बोलीभाषेतील पारंपारिक गीतांवर पारंपारिक पोशाख परिधान करुन नृत्य सादर करुन नवोदय विद्यालयाच्या वातावरणात चैतन्य निर्माण केले. त्याच प्रमाणे रक्षाबंधन ही मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आली. विद्यालयात शिकत असलेल्या सख्ख्या भावंडांना मंचावर बोलावून बहिणींनी आपल्या लाडक्या भाऊरायाला चैतन्यपुर्ण वातावरणात राखी बांधली. सोबतच विद्यालयातील सर्व विद्यार्थीनींनी आपल्या वर्गातील व कनिष्ठ तसेच वरिष्ठ वर्गातील विद्यार्थ्यांना राखी बांधुन कौटुंबिक वातावरण तयार केले.

कार्यक्रमाचे सुत्र संचालन व आभार प्रदर्शन अकरावीचे विद्यार्थी जयेंद्र पावरा, दिशांत वळवी यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रमोद कुलकर्णी, सतीशकुमार, लालागिर गोस्वामी, शंकर यादव, अशोक शेखावत, अनिल ठाकरे, निर्मला, अर्चना खैरनार, पायल पटेल या शिक्षकांनी व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# चंद्रपूर जिल्ह्यातील एकात्मिक बाल विकास सेवा मध्ये रिक्त पदांचा डोंगर

## खा.प्रतिभा धानोरकर यांच्या प्रश्नावर केंद्र सरकारची कबुली

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

चंद्रपूर जिल्ह्यातील एकात्मिक बाल विकास सेवा (ICDS) योजनेतील रिक्त पदांमुळे प्रशासकीय यंत्रणेवर मोठा ताण येत असल्याचा मुद्दा खासदार प्रतिभा धानोरकर यांनी लोकसभेत उपस्थित केला होता. महिला आणि बाल विकास मंत्रालयाच्या राज्यमंत्री सावित्री ठाकुर यांनी दिलेल्या उत्तरातून या वस्तुस्थितीला दुजोरा मिळाला आहे.



मंत्र्यांनी दिलेल्या माहितीनुसार, चंद्रपूर जिल्हा परिषदेत बाल विकास प्रकल्प अधिकारी (गट-ब) च्या १५ मंजूर पदांपैकी १४ पदे रिक्त आहेत. तसेच, अंगणवाडी पर्यवेक्षकांच्या ८९ मंजूर पदांपैकी ३० पदे रिक्त आहेत. जिल्हा परिषदेच्या १५ एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्पांमध्ये, २,४४७ अंगणवाडी सेविकांच्या मंजूर पदांपैकी ६९ पदे आणि २,४४७ अंगणवाडी मदतनिसांच्या मंजूर पदांपैकी १५४ पदे रिक्त आहेत. मंत्रालयानेच दिलेल्या माहितीनुसार, या रिक्त पदांमुळे सेवांची गुणवत्ता आणि व्यापकता टिकवून ठेवण्यासाठी कार्यरत अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त कामाचा बोजा पडत आहे.या संदर्भात, महिला आणि बाल विकास मंत्रालयाने स्पष्ट केले आहे की 'मिशन सक्षम अंगणवाडी आणि पोषण २.०' ही केंद्र पुरस्कृत योजना आहे. यामध्ये, केंद्र सरकार धोरण आणि नियोजनासाठी जबाबदार असले, तरी दैनंदिन कार्यक्रम अंमलबजावणीची जबाबदारी राज्य सरकारे आणि केंद्रशासित प्रदेश प्रशासनांची आहे. त्यामुळे विविध स्तरांवरील रिक्त पदे भरण्याचे प्रकरण संबंधित राज्यांच्या अधिकारक्षेत्रात येते. या प्रश्नावर केंद्र सरकार राज्य सरकारांसोबत नियमितपणे संवाद, व्हिडिओ कॉन्फरन्स आणि बैठकांद्वारे चर्चा करत असल्याचे सांगितले आहे.

# प्रवरा साहित्य पुरस्काराने सन्मानित भविष्यात साहित्य अकादमी पुरस्काराचे मानकरी ठरले-पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील

**शिर्डी । प्रतिनिधी**

सलग ३५ वर्षांपासून साहित्यिक व कलाकारांचा पुरस्कार देऊन गौरव करण्याची परंपरा प्रवरा परिवाराने अखंडपणे जपली आहे. लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील यांच्या संकल्पनेतून सुरू झालेला हा पुरस्कार सोहळा आज मराठी साहित्यविश्वातील एक मानाचा पुरस्कार म्हणून मान्यता पावला आहे. या पुरस्काराने गौरविण्यात आलेले अनेक साहित्यिक पुढे साहित्य अकादमी पुरस्काराचे मानकरी ठरले आहेत, असे गौरवोद्गार जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी काढले.सहकार चळवळीचे जनक पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांच्या १२५ व्या जयंतीदिनानिमित्त प्रवरानगर येथे प्रवरा परिवारातर्फे आयोजित साहित्य व कला गौरव पुरस्कार वितरण सोहळा आणि शेतकरी दिन कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अखिल भारतीय मराठी महामंडळाचे अध्यक्ष तथा महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष डॉ. मिलींद जोशी होते.याप्रसंगी आमदार काशिनाथ दाते, आमदार विठ्ठलराव लंघे पाटील, आमदार अमोल खताळ, अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक अण्णासाहेब म्हस्के पाटील, प्रवरा इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेसचे कुलपती डॉ. राजेंद्र विखे पाटील, पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन डॉ. सुजय विखे पाटील, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील, धनश्री विखे पाटील व इतर मान्यवर उपस्थित होते.

पालकमंत्री श्री. विखे म्हणाले, यंदाचा पुरस्कार सोहळा काही विशेष पार्श्वभूमीवर साजरा होत आहे. पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांच्या जयंतीचे हे १२५ वे वर्ष! त्याचवेळी युनेस्कोने 'आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष' साजरे करण्याचा निर्णय घेतला आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे आपल्या मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याचा ऐतिहासिक निर्णय देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली घेण्यात आला, ही सर्व मराठी भाषिकांसाठी अत्यंत अभिमानास्पद बाब आहे.आजच्या या सोहळ्यात साहित्य, कला आणि नाट्य क्षेत्रातील मान्यवरांचा पुरस्काराने सन्मान केला जात आहे. त्यांच्या उपस्थितीमुळे ही सहकारपंढरी अधिकच प्रेरणादायी व उजळून निघालेली आहे. दरवर्षी आयोजित करण्यात येणाऱ्या या गौरव सोहळ्याच्या माध्यमातून मराठी सारस्वतांचा सन्मान करण्याचे भाग्य प्रवरा परिवाराला लाभते, हे आमच्यासाठी अत्यंत प्रेरणादायी आहे. साहित्य, कला व संस्कृतीची अभिरुची जोपासण्याच्या आमच्या प्रयत्नांना आपला असाच सक्रिय पाठिंबा लाभावा, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.अध्यक्षीय मनोगतात डॉ. जोशी म्हणाले, साहित्य ही केवळ अभिव्यक्ती नसून ती समाज परिवर्तनाची शक्ती आहे. लेखकांनी सत्याचा शोध घ्यावा, कोणत्याही गटाच्या दबावाखाली न राहता स्वतंत्र विचार करावा, हीच साहित्यिकांची खरी जबाबदारी आहे. विचारधारेपेक्षा विचार महत्त्वाचा आहे. सध्याच्या काळात तंत्रज्ञानाचा अतिरेक होत




असतानाही, माणुसकी जपणारी संवेदनशीलता टिकवण्यासाठी साहित्य अत्यावश्यक आहे.

आपल्या समाजात विचारशक्ती, तर्कशुद्धता, विवेक व विज्ञाननिष्ठा यांची कमतरता जाणवत आहे. त्यामुळे साहित्य, संगीत, चित्रकला यांची नाळ समाजाशी घट्ट राहिली पाहिजे. ग्रंथालये ओस पडत आहेत, वाचनसंस्कृती कमी होत आहे, हे चिंतेचे कारण आहे. मराठी भाषेचे जतन करणे व तिचा अभिजातपणा टिकवणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे.महाराष्ट्राच्या संस्कृतीत राजकारण रुजवण्यासाठी जितका प्रयत्न आवश्यक आहे, तितकाच संस्कृतीच्या माध्यमातून राजकारणाला सुसंस्कृत दिशा देणेही गरजेचे आहे. भाषेचा आणि विचारांचा मर्यादित वापर न करता व्यापक व विवेकी संवाद घडवणे ही काळाची गरज आहे, असेही डॉ. जोशी यांनी स्पष्ट केले.जीवनगौरव पुरस्कार्थी साहित्यिक डॉ. सुनिलकुमार लवटे म्हणाले, साहित्य पुरस्कारासाठी संपूर्ण गाव उपस्थित राहते, हे मी प्रथमच पाहत आहे. विसाव्या शतकात जनमानसावर ललित साहित्याचा प्रभाव होता. एकविसावे शतक वैचारिक साहित्याचे आहे. वैचारिक साहित्यातूनच समाज प्रगल्भ होतो. महाराष्ट्राची वैचारिक जडणघडण स्वर्गीय यशवंतराव चव्हाण व तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी घडवली. आज आपल्या जाणीवा कमी झाल्या आहेत. जीवन समृद्ध करण्यासाठी वाचन आवश्यक आहे. देशाला जेव्हा वाचन करणारा नेता लाभतो, तेव्हा देशाचे भविष्य बदलते.अण्णासाहेब म्हस्के पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त केले. तर पुरस्कार्थींच्या वतीने प्रतिनिधी म्हणून अतांबऱ्या शिरढोणकर यांनी मनोगत मांडले.पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांच्या जयंती दिनाचे औचित्य साधून प्रवरा परिवाराने साहित्य, नाट्य आणि कला क्षेत्रातील मान्यवरांना त्यांच्या नावाने देण्यात येणाऱ्या पुरस्काराने गौरविण्याची परंपरा सुरू केली. यंदाचे हे ३५ वे वर्ष होते.यावर्षी साहित्यक्षेत्रात पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील साहित्य जीवनगौरव पुरस्कार कोल्हापूरचे डॉ. सुनिलकुमार लवटे यांना प्रदान करण्यात आला. राज्यस्तरीय उत्कृष्ट साहित्य पुरस्कार मुंबईच्या डॉ. मिनाक्षी पाटील आणि डॉ. एच. व्ही. देशपांडे यांना देण्यात आले. राज्यस्तरीय नाट्यसेवा पुरस्कार दिलीप जगताप यांना, तर राज्यस्तरीय कला गौरव पुरस्कार अतांबऱ्या शिरढोणकर व प्रसाद अंतरवेलीकर यांना प्रदान करण्यात आले.अहिल्यानगर जिल्हा साहित्य पुरस्कार संगमनेरचे संतोष भालेराव यांच्या 'लालायलू' या कादंबरीस, तर जिल्हा विशेष साहित्य पुरस्कार संगमनेरचे श्रीकांत कासट यांच्या 'दुर्ग वैभव' या पुस्तकास देण्यात आला. प्रवरा परिसर पुरस्कार संदीप तपासे यांच्या 'काठावरची माणसं' या कथासंग्रहाला मिळाला. तसेच वयाच्या ८०व्या वर्षी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांच्या जीवनावर शोधनिबंध सादर करणारे व त्यांच्या कार्यावर 'सहकाराचा कल्पवृक्ष - डॉ. विठ्ठलराव विखे पाटील' हे पुस्तक प्रकाशित करणारे डॉ. वसंतराव ठोंबरे यांनाही विशेष पुरस्काराने गौरविण्यात आले.पुरस्कार निवड समितीमध्ये अध्यक्ष ज्येष्ठ विचारवंत रावसाहेब कसबे, सदस्य एकनाथ पगार, प्राचार्य डॉ. दिलीप धोंडगे, प्रा. राजेंद्र सलालकर यांचा समावेश होता. पुरस्कारांची अधिकृत घोषणा श्री. रावसाहेब कसबे यांनी केली.कार्यक्रमात राजा मंगळवेढेकर लिखित 'भूमिपुत्र' या डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांच्या जीवनकार्यावरील पुस्तकाच्या दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशनही करण्यात आले.

# कल्याणमध्ये नारळी पौर्णिमा मोठ्या उत्साहात साजरी

**बदलापूर । प्रतिनिधी**

मुंबई आणि उपनगरातील कोळीवाड्यांमध्ये नारळी पौर्णिमा हा सण पारंपारिक उत्साहात साजरा करण्यात येतो. कल्याण शहरातही शुक्रवारी सकाळपासूनच जल्लोषाचे वातावरण होते. गल्ल्यागल्ल्यांत रंगीबेरंगी सजावट करण्यात आली होती तसेच पारंपारिक कोळी वाद्यांचा गजर ऐकू येत होता. कल्याण कोळीवाड्यासह संपूर्ण शहर उत्सवाच्या रंगात रंगले होते.

नारळी पौर्णिमेच्या निमित्ताने आगरी-कोळी समाजाच्या वतीने भव्य मिरवणूक काढण्यात आली. यामध्ये आगरी-कोळी पारंपारिक संस्कृतीचे दर्शन सर्वांना घडले. मुंबईचा आणि दर्याचा राजा पारंपारिक पोशाखात मोठ्या उत्साहात या मिरवणुकीत सहभागी झाला.

या मिरवणुकीस माजी केंद्रीय मंत्री कपिल



पाटील यांनीही उपस्थिती दर्शवत आगरी-कोळी बांधवांना नारळी पौर्णिमेच्या शुभेच्छा दिल्या. दरवर्षीप्रमाणे, मुंबई व समीपवर्ती शहरांतील कोळी बांधव समुद्राला सोन्याचा नारळ अर्पण करून समुद्र देवतेची पूजा करतात. वर्षभर आमची रक्षा कर, अशी श्रद्धेने प्रार्थना करून समुद्रात सोन्याचा नारळ अर्पण केला जातो.

# निलज येथे करमाळा तहसील कार्यालयाचा अनोखा रक्षाबंधन सोहळा

**सोलापूर । प्रतिनिधी**

हरित महाराष्ट्र समृद्ध महाराष्ट्र या संकल्पनेतून करमाळा तहसील कार्यालयाने निलज गावात एक आगळा-वेगळा रक्षाबंधन कार्यक्रम आयोजित केला. तहसीलदार शिल्पा ठोकडे यांच्या मार्गदर्शनाखाली निलज ,पोटेगाव रोडलगत वस्तीतील १२ महिलांना केशर जातीच्या आंब्याची रोपे भेट देण्यात आली. या रोपांची लागवड घराजवळच्या रस्त्याच्या कडेला करण्यात आली, त्यामुळे पर्यावरण संवर्धनासोबतच रक्षाबंधनाच्या परंपरेला पर्यावरणपूरक अर्थ प्राप्त झाला.

तहसील कार्यालयाच्या कर्मचाऱ्यांनी गावात भेट देऊन प्रत्येक महिलेला आंब्याचे रोप वाटप केले. यावेळी रोपांची योग्य देखभाल



कशी करावी, त्याविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. ग्रामस्थांनी देखील उत्साहाने सहभाग घेत हरितीकरण मोहिमेला पाठिंबा दर्शविला.

या कार्यक्रमात तहसीलदार शिल्पा ठोकडे यांच्या मार्गदर्शनाखाली तलाठी हर्षल शेंगळे, पुरस्कार मिळविलेले महसूल सेवक रवीभाऊ जाधव व योगेश गायकवाड, तात्यासाहेब गायकवाड, दिनेश गायकवाड, जालिंदर गायकवाड, भारत गायकवाड, राजेश गायकवाड, मोहन गायकवाड, दिलीप घोलप, सोमनाथ भोसले तसेच अनेक ग्रामस्थ उपस्थित होते.रक्षाबंधनाच्या निमित्ताने वृक्षारोपणाचा उपक्रम राबवून करमाळा तहसील कार्यालयाने पर्यावरण संवर्धनाचा नवा संदेश दिला.

# महात्मा फुले जनआरोग्य योजनेतून दर्जेदार आरोग्यसेवा मोफत मिळतील-पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

समाजातील गोरगरिबांना महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेतून ५ लाख रुपयांपर्यंतच्या आरोग्यसेवा मोफत मिळतील, अशी सुविधा शासनाने उपलब्ध करून दिली आहे. या योजनेचा अधिकाधिक लाभ नेवासा परिसरातील नागरिकांनी घ्यावा, तसेच त्यांना दर्जेदार आरोग्यसेवा मिळावी, असा विश्वास जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी व्यक्त केला.नेवासा येथील प्रायमस मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल व नेफ्रोलाइफ डायलिसिस केंद्राचा शुभारंभ पालकमंत्री विखे पाटील यांच्या हस्ते झाला. त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी आमदार विठ्ठलराव लंघे पाटील, माजी आमदार पांडुरंग अभंग, उद्धव महाराज मंडलिक, किसन पाटील, प्रभाकर शिंदे, ह.भ.प. अंकुश महाराज जगताप, नितीन दिनकर, किसनराव गडाख, डॉ. निलेश लोखंडे, शंकरराव लोखंडे, रेश्मा लोखंडे आदी उपस्थित होते.

पालकमंत्री विखे पाटील म्हणाले, नेवासा ही संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या पदस्पर्शाने पावन झालेली भूमी असून तालुक्याला महान अध्यात्मिक परंपरा लाभलेली आहे. 'संत ज्ञानेश्वर सृष्टी' प्रकल्प जलसंपदा विभागामार्फत हाती घेण्यात आला आहे. या अंतर्गत घाट, पूल व रस्त्यांची निर्मिती करत मंदिर परिसराचा सर्वसमावेशक विकास करण्यात येणार आहे.

जायकवाडी धरण पूर्ण क्षमतेने भरल्याने नुकतेच जलपूजन पार पडले. धरणातील कालव्यांद्वारे वाहणाऱ्या पाण्यापैकी सुमारे ४० टक्के पाणी वाया जात होते. ही गळती थांबवण्यासाठी कालव्यांच्या लाईनिंगसाठी ८०० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. मुळा धरणात २ टीएमसीपर्यंत गाळ जमा झालेला असून तो काढण्यासाठी व फ्लॅप बसविण्यासाठीही मंजुरी दिली आहे. त्यामुळे साठवण क्षमता २ ते ३ टीएमसीने वाढणार आहे. याचा थेट लाभ नेवासा व राहुरी तालुक्यांना मिळणार आहे.मधमेश्वर येथील बंधाऱ्याची क्षमता दीडपट करण्याचे काम हाती घेण्यात आले असून बॅकवॉटरमधील पाण्याचा शेतीस मोठा फायदा होईल. नेवासा शहरातील सांडपाणी थेट नदीत जाऊ नये, यासाठी सांडपाणी शुद्धीकरण प्रकल्प उभारण्याच्या सूचना नगरपंचायत प्रशासनाला देण्यात आल्या असल्याचेही त्यांनी सांगितले.नेवासा येथे सुमारे साडेसात कोटी रुपयांच्या विविध विकासकामांचे लोकार्पण व शुभारंभ करण्यात आले. दीड कोटी रुपये खर्चून उपनिबंधक कार्यालयाची उभारणी करण्यात आली असून १९ कोटी रुपयांच्या माध्यमातून पोलीस ठाणे व पोलीस वसाहतीचे काम सुरू आहे. विकासपर्वाची ही सुरुवात असून सर्वसामान्य नागरिक केंद्रस्थानी ठेवून शासन विविध योजनांच्या माध्यमातून त्यांचा सर्वांगीण विकास साधण्याच्या प्रयत्नात आहे, असे पालकमंत्री श्री.विखे पाटील यांनी स्पष्ट केले.आमदार श्री.लंघे म्हणाले, नेवासा तालुक्याचा विकासाचा बॅकलॉग आजही प्रलंबित आहे. मात्र साडेसात कोटी रुपयांच्या विकासकामांद्वारे या विकास पर्वाची सुरुवात झाली आहे. पालकमंत्री विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्याचा सर्वांगीण विकास करण्यात येईलकार्यक्रमास पदाधिकारी, अधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## मुस्तापूर ते नायगांव रस्त्याचे निकृष्ट दर्जाचे होत असलेले काम तंटामुक्त समितीचे अध्यक्ष श्रीराम पाटील पवार व नागरिकांनी रोखलं

**नायगाव । हनुमंत चंदनकर**

नायगांव ते मुस्तापूर जाणाऱ्या रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे होत असल्याचे लक्षात येताच बेटकबिलोली येथील तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष श्रीराम पाटील पवार व नागरिकांनी आज दिनांक १० ऑगस्ट रोजी थांबवलं प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत पूर्वी काम झालं होतं ते देखील म्हणावं तसं मजबूत काम झालं नव्हतं परंतु बघता बघता पाच वर्षे लोटून गेली व रस्ता खूपच खराब होऊन गेला होता वाणी जात येत नव्हती मग सडक योजनेअंतर्गत मोठ्या प्रमाणावर ती निधी मिळून देखील काम होत नसल्याने नागरिकांच्या लक्षात आलं व नागरिकांचा जमा झाला बेटकबिलोली येथीलसामाजिक कार्यकर्ते तथा तंटामुक्त समितीचे अध्यक्ष श्रीराम पाटील पवार यांच्या पुढाकाराने विठ्ठल जाधव धोंडीबा शिंदे , बालाजी धुमाळे, सरपंच प्रतिनिधी अविनाश जाधव यास नागरिकांनी रस्त्याचे काम हे स्टीमेन्टप्रमाणे व मजबूत झाले पाहिजे अन्यथा कामच करू नका असा इशारा देत आज डाग डूगी करण्यासाठी आलेल्या कामगारांना परत पाठवले व काम होऊ देणार नाही असा इशारा देत मुस्तापूरकर आणि बेटकबिलोलीकर एकवटले



## एक वही एक पेन या उपक्रमांतर्गत शिवछत्रपती विद्यालयात विद्यार्थ्यांना साहित्य वाटप संपन्न

**परळी । प्रतिनिधी**

महामानव विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त पत्रकार विकास वाघमारे व विकास रोडे यांच्यावतीने एक वही एक पेन हे अभियान राबविण्यात आले होते. या अभियानांतर्गत जमा झालेल्या साहित्याचे आज दिनांक ९ ऑगस्ट रोजी परळी शहरातील शिवछत्रपती विद्यालयातील विद्यार्थ्यांना साहित्य वाटप करण्यात आले.

शिवछत्रपती विद्यालयात संपन्न झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ मार्गदर्शक प्रा. दासू वाघमारे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ पत्रकार व साहित्यिक रानबा गायकवाड, मुफ्टा शिक्षक संघटनेचे बीड जिल्हाध्यक्ष भैय्यासाहेब आदोडे, टीव्ही नाईनचे पत्रकार संभाजी मुंडे, तालुका आरोग्य अधिकारी विष्णू मुंडे, पत्रकार धीरज जंगले ,सामाजिक कार्यकर्ते नवनाथ दाने, गौतम रोडे ,जीवन वाघमारे ,विजय व्हावळे,विनायक काळे, शिवछत्रपती विद्यालयाचे माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक संजय समुद्रे, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक शिवाजी उफाडे आदी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी प्रा. दासू वाघमारे, पत्रकार रानबा गायकवाड, भैय्यासाहेब आदोडे, विष्णू मुंडे, सिद्धेश्वर इंगोले यांनी आपले विचार मांडले. यावेळी बोलताना सर्व मान्यवरांनी विद्यार्थ्यांना एक वही एक पेनाचे महत्त्व पटवून दिले. याप्रसंगी सर्व मान्यवर पाहुण्यांच्या हस्ते शाळेतील विद्यार्थी व विद्यार्थिनींना वह्या आणि पेनांचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक पत्रकार व साहित्यिक रानबा गायकवाड यांनी केले. सूत्रसंचालन अशोक फड यांनी तर आभार सिद्धेश्वर इंगोले यांनी केले. कार्यक्रमास शाळेतील शिक्षक शिक्षिका विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## माऊलींच्या सुवर्ण कलशारोहणासाठी राहुल ज्ञानेश्वर चव्हाण यांच्याकडून १ लाख ११ हजार देणगी

**केज । प्रतिनिधी**

दातृत्व कर्तृत्व आणि नेतृत्व यांचा त्रिवेणी संगम म्हणजे राहुल ज्ञानेश्वर चव्हाण असं म्हटलं तर वावगं ठरणार नाही, इवलेसे रोप लाविलेये द्वारी, त्याचा वेणू चालला गगनावरी दहा वर्षांपासून राहुल ज्ञानेश्वर चव्हाण हे समाजातील विविध क्षेत्रात दातृत्वाचे काम करताना दिसत आहेत. आज संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज यांच्या ७५०व्या जयंती महोत्सवाच्या सप्तशतकोत्तर सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त आळंदी येथील श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटीने माऊलींच्या संजीवन समाधी मंदिराच्या शिखरावर ११ किलो सुवर्णाचे कलशारोहण करण्याचा संकल्प सोडला आहे. हा महोत्सव गोकुळअष्टमी, दि. १५ ऑगस्ट २०२५ रोजी साजरा होणार आहे. या मंगल कार्यासाठी सर्व भाविक, भक्त आणि वारकऱ्यांना स्वेच्छेने आर्थिक देणगी किंवा वस्तुरूपी सुवर्ण दान देण्याचे आवाहन संस्थान कमिटीने केले आहे. या आवाहनाला प्रतिसाद देत आळंदी शिवसेना शहर प्रमुख राहुल ज्ञानेश्वर चव्हाण यांनी उदार अंतःकरणाने देणगी अर्पण केली आहे.

राहुल ज्ञानेश्वर चव्हाण यांनी आपले आजोबा कै. भिकू मारुती चव्हाण आणि आजी कै.शांताबाई भिकू चव्हाण यांच्या स्मरणार्थ श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या सुवर्ण कलशारोहण कार्यासाठी १,११,१११ रुपये इतकी देणगी माऊलींच्या चरणी अर्पण केली आहे. या दानशूर योगदानाबद्दल श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटीने राहुल चव्हाण यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली आहे.




## बीडमध्ये १७ ऑगस्टला राज्यस्तरीय लहान मुलांचा फॅशन शो चला हवा येऊ द्या सेलिब्रिटींच्या उपस्थितीत रंगणार भव्य सोहळा

**बीड । प्रतिनिधी**

देवगिरी प्रतिष्ठान, संचलित तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन, बीड यांच्या वतीने राज्यस्तरीय लहान मुलांचा फॅशन शो 'चॅम्प ऑन रॅम्प २०२५' हा भव्य कार्यक्रम रविवार, दि.१७ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ११ वाजता बीड येथील रामकृष्ण लॉन्स, कॅनॉल रोड, शाहूनगर, ऋबीड येथे आयोजित करण्यात येणार आहे.



या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे 'चला हवा येऊ द्या' या लोकप्रिय टीव्ही कार्यक्रमातील सेलिब्रिटी पाहुण्यांची विशेष उपस्थिती, जी संपूर्ण कार्यक्रमात विशेष आकर्षण ठरणार आहे. कार्यक्रमात राज्यभरातील विविध फॅशन डिझायनिंग कॉलेजांमधील विद्यार्थी-डिझायनर्सना स्वतः डिझाइन केलेल्या पोशाखांचे सादरीकरण करण्याची संधी दिली जाणार असून, या पोशाखांचे सादरीकरण ३ ते १५ वयोगटातील बाल कलाकार रॅम्पवर मॉडेल्सच्या रूपात करणार आहेत.

स्पर्धा तीन गटांत होणार असून पहिला गट ३ ते ६ वर्षे, दुसरा गट ७ ते ११ वर्षे आणि तिसरा गट १२ ते १५ वर्षे असा असेल. सर्व सहभागी बालक व डिझायनर्सना ट्रॉफी, प्रमाणपत्र, प्रोफेशनल फोटोशूट आणि दोन मोफत प्रवेश पास देण्यात येतील. याशिवाय 'बेस्ट चॅम्प ऑन रॅम्प' आणि 'बेस्ट डिझायनर' या पुरस्कारांसाठी प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांकांचे सन्मान दिले जातील.

नोंदणी शुल्क ७०० असून जागा मर्यादित आहेत. इच्छुकांनी नोंदणीसाठी ९३१०६६६६५२ किंवा ९९७५९९४५१२ या क्रमांकांवर संपर्क साधावा किंवा पोस्टरवरील क्यूआर कोड व ऑनलाईन लिंक वापरावी. बालक व डिझायनर्ससाठी स्वतंत्र नोंदणी लिंक व क्यूआर कोड उपलब्ध असून, आपल्या श्रेणीनुसार योग्य पर्याय वापरावा. पालकांनी आपल्या मुलांची त्वरित नोंदणी करून त्यांना फॅशन रॅम्पवर झळकण्याची संधी द्यावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## शिवाजीराव हार्ट केअर यां रुग्णालयात लिफ्ट अपघातप्रकरणी बजावली नोटीस

### चौधरी साहेब जिल्ह्यातील लिफ्टचे इन्स्पेक्शन होणार का?

### मनोज जरांगे यांनी केला होता लिफ्टने प्रवास

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरात चार दिवसांपूर्वी मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील एका रुग्णालयात आल्यानंतर लिफ्ट पहिल्या मजल्यावरून आदळल्याचा प्रकार घडला होता. याबाबत आता चौकशी सुरू करण्यात आली आहे. धक्कादायक म्हणजे रुग्णालयाने नूतनीकरण न करताच विनापरवाना लिफ्ट सुरू ठेवल्याचे स्पष्ट झाले असून याबाबत विद्युत विभागाने रुग्णालयाला नोटीस बजावली आहे. मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील हे ४ ऑगस्ट रोजी बीडमध्ये दौऱ्यावर होते. यावेळी त्यांनी नाट्यगृहासमोर असलेल्या शिवाजीराव हार्ट केअर यां रुग्णालयात जाऊन एका रुग्णाची भेट घेतली होती. दरम्यान, या भेटीसाठी रुग्णालयात गेल्यानंतर दुसऱ्या मजल्यावर लिफ्टद्वारे जात असताना लिफ्ट सुरू झाल्यानंतर पहिल्या मजल्यावर पोहोचण्यापूर्वीच २५ सेकंदांमध्येच आदळली होती. क्षमतेपेक्षा जास्त लोक झाल्याने हा प्रकार घडल्याचे सांगितले गेले होते. मात्र लिफ्टच्या क्षमतेइतकेच लोक आतमध्ये होते असा दावा सोबत असलेल्या कार्यकर्त्यांनी केला होता. यावर या प्रकाराची चौकशी करण्याची मागणीही केली गेली होती.




## बानाई महिला बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेने आगळ्यावेगळ्या पद्धतीने साजरा रक्षाबंधन



**बीड । प्रतिनिधी**

रक्षाबंधन बानाई महिला बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेने आगळ्यावेगळ्या पद्धतीने साजरा केला संस्थेच्या संस्थापक अध्यक्ष मीनाक्षी डोमाळे देवकते यांनी शिरूर तालुक्यातील तागडगाव येथील सर्पमित्र तसेच जंगली प्राण्याचे रक्षण करणारे सिद्धार्थ सोनवणे भैया यांना तिथे जाऊन राखी बांधली त्यांनी परवा दिवशी एक बिबट्या विहिरीत न बाहेर काढला आता सध्या तो त्यांच्याजवळ उपचार घेत आहे त्यांच्या या कामात त्यांना मदत करण्याचे आश्वासन दिले त्यानंतर श्री. क्षेत्र नारायण गड इथल्या महाराजांचे दर्शन घेऊन त्यांचे आशीर्वाद घेऊन बीड मधल्या सिविल हॉस्पिटलमध्ये गेटवर सेवा देणारे शिपाई त्यांच्यासोबत रक्षाबंधन साजरा केला त्यानंतर आपल्यासाठी अहो रात्र तयार असणारे म्बुलन्स चालक त्यांना पण राख्या बांधून त्यांचा सन्मान केला आणि डॉक्टर यांना पण राख्या बांधल्या आणि डॉक्टर साहेबांसोबत चर्चा केली त्यावेळी उपस्थित बालरोग तज्ञ हनुमान डॉ. हनुमंत पाखरे डॉ. शहाणे साहेब डॉ. तांदळे साहेब आपल्या सिव्हिल हॉस्पिटल मधील ज्या डिलिव्हरी महिलांचे मृत्यू होत आहेत त्या संदर्भात त्यांच्याशी सविस्तर चर्चा केली आणि आम्हाला गिफ्ट नको तर सिविल हॉस्पिटल मध्ये जास्तीत जास्त चांगल्या सुविधा आणि जास्तीत जास्त पेशंटची काळजी घेतली जावी हे आश्वासन घेतलं अशा प्रकारे बाणाई महिला बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेने व त्यांच्या संस्थेच्या सदस्या यांनी हा कार्यक्रम पार पाडला.

## चुकीच्या वीज बिलाच्या निषेधार्थ एकनाथ कराड यांचे ११ ऑगस्ट पासून महावितरण कार्यालया समोर आमरण उपोषण

**परळी । प्रतिनिधी**

शहरातील महावितरण कार्यालयाच्या वतीने देण्यात येणारे चुकीचे बिल आणि सोमेश्वर नगर भागातील वायरमन यांच्या त्रासाला कंटाळून एकनाथ तुकाराम कराड परळी हे दिनांक ११ ऑगस्ट पासून उप अभियंता महावितरण कार्यालय ,परळी यांच्या कार्यालयासमोर आमरण उपोषणास बसणार आहेत.



याबाबत उपअभियंता महावितरण परळी यांना दिलेल्या निवेदनात एकनाथ तुकाराम कराड यांनी म्हटले आहे की, मागील दोन वर्षात माझ्या घरचे मीटर दोन वेळा बदलण्यात आले. तसेच मीटर बदलताना चुकीची रिडींग देण्यात आली. त्यामुळे विज बिल जास्त देण्यात येत आहे. याविषयी मला घरचे वीज कनेक्शन तोडण्याची वारंवार वायरमन कडून धमकी देण्यात येते आहे.

मला महावितरण कार्यालयाने चुकीचे बील न देता तीन महिन्यांच्या सरासरी घेऊन बिल द्यावे तसेच वायरमन कडून होत असलेल्या त्रासाबद्दल सोमवार दिनांक ११ ऑगस्ट रोजी एकनाथ कराड महावितरण कार्यालयाच्या समोर आमरण उपोषणास बसणार आहेत.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077